२०१७च्या कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्या; आ. सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

पात्र शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत समाविष्ट करून २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याची आ.मुनगंटीवार यांची आग्रही मागणी

आ. मुनगंटीवार यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे दिले निर्देश

मुंबई : शेतकऱ्याच्या कष्टाला न्याय मिळेपर्यंत त्यांचा प्रश्न सातत्याने मांडत राहणे आणि तो प्रश्न शासनाच्या निर्णयाच्या पातळीवर नेऊन त्याला न्याय्य मिळवून देणे, ही आ. सुधीर मुनगंटीवार यांची ओळख राहिली आहे. याच संवेदनशील शेतकरीहिताच्या भूमिकेतून त्यांनी २०१७च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांचा प्रश्न पुन्हा एकदा शासनाच्या सर्वोच्च पातळीवर नेला. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत पात्र असूनही विविध तांत्रिक, प्रशासकीय अथवा बँकिंग कारणांमुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफीचा लाभ मिळावा, यासाठी आ. मुनगंटीवार यांनी मुंबईतील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी ‘वर्षा’ येथे दिनांक २८ सप्टेंबर रोजी भेट घेऊन आग्रही मागणी केली. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सन २०१७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दि. २८ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना लागू करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यात आला. मात्र, पात्रता असूनही विविध तांत्रिक, प्रशासकीय, बँकिंग व प्रक्रियात्मक कारणांमुळे काही शेतकरी या लाभापासून वंचित राहिले आहेत. २०२६ मध्ये राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. त्यामुळे २०१७ मध्ये पात्र असूनही कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना या नव्या योजनेच्या माध्यमातून न्याय देण्याची ही योग्य संधी असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

पात्र शेतकऱ्याची कोणतीही चूक नसताना केवळ प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणांमुळे त्याला कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही, तर त्याची किंमत त्या शेतकऱ्याने का मोजावी, हा मूलभूत प्रश्न आहे. कर्जमाफीचा लाभ वेळेत न मिळाल्यामुळे संबंधित कर्जखात्यांवर पुढील काळात व्याज, दंडात्मक व्याज,

विलंब शुल्क आणि इतर आकार वाढत गेले. त्यामुळे शासनाच्या योजनेचा लाभ मिळणे अपेक्षित असताना उलट कर्जाचा आर्थिक बोजा वाढत गेला.शासनाच्या प्रक्रियेत झालेल्या विलंबाची किंमत पात्र शेतकऱ्याने मोजणे हा केवळ आर्थिक नव्हे, तर न्यायाचा विषय आहे, अशी ठाम भूमिका आ. मुनगंटीवार यांनी मांडली.

त्यामुळे दि. २८ जून २०१७ रोजीच्या कर्जखात्याची स्थिती आधारभूत धरून संबंधित पात्र शेतकऱ्यांचे रु. २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत न मिळाल्यामुळे कर्जखात्यावर जमा झालेले दंडात्मक व्याज, विलंब शुल्क आणि इतर अतिरिक्त आर्थिक बोजा पूर्णपणे माफ करण्यात यावा, अशीही मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली.याशिवाय २०१७च्या योजनेअंतर्गत पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांची विशेष पडताळणी करण्यात यावी आणि पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६मध्ये विशेष बाब म्हणून समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली.

तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना विशेष ऑफलाइन पडताळणीची संधी उपलब्ध करून देण्याची मागणीही आ. मुनगंटीवार यांनी केली. तसेच संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मध्यवर्ती बँका आणि इतर संबंधित बँकांना अशा पात्र वंचित शेतकऱ्यांची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश देण्यात यावेत, असेही आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. २०१७ मध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू झालेल्या कर्जमाफीच्या निर्णयाला आज २०२६ मध्ये न्याय्य पूर्तता मिळावी, हीच या मागणीमागची भूमिका आहे. पात्र असूनही कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा दिलासा मिळावा आणि शासनाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीतील विलंबाचा अतिरिक्त आर्थिक बोजा त्यांच्या माथी पडू नये, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न मुख्यमंत्र्यांकडे प्रभावीपणे मांडला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीची दखल घेत सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने, २०१७च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय होण्याच्या प्रक्रियेला आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 8563/सप्टें/26

दिनांक २५.०९.२०२६

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई

सप्रेम वंदेमातरम्...!!

**विषय :** छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत पात्र असूनही कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ मध्ये समावेश करून रु. २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याबाबत.

महोदय,

आपल्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः सन २०१७ मध्ये आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात लागू करण्यात आलेली छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना ही राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा देणारी ऐतिहासिक योजना ठरली.

या योजनेच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी करून त्यांना आर्थिक आधार देण्यात आला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन एवढ्या मोठ्या प्रमाणावर कर्जमाफीचा निर्णय घेणे ही आपल्या शेतकरीहिताच्या धोरणाची महत्त्वपूर्ण बाब आहे.

आज पुन्हा आपल्या नेतृत्वाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६च्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा दिलासा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे २०१७ मध्ये आपल्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या शेतकरीहिताच्या या कर्जमाफीच्या निर्णयाची व्याप्ती पुढे नेत, त्या वेळी पात्र असूनही काही कारणांमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही न्याय देण्याची ही योग्य वेळ आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत पात्र असूनही काही शेतकरी विविध तांत्रिक, प्रशासकीय, बँकिंग व प्रक्रियात्मक कारणांमुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

या संदर्भात अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ न मिळणे ही संबंधित शेतकऱ्यांची कोणतीही चूक नाही. त्यामुळे शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीतील विलंब किंवा प्रशासकीय कारणांमुळे वाढलेला आर्थिक बोजा शेतकऱ्यांवर टाकणे योग्य ठरणार नाही.



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।। पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

कर्जमाफीचा लाभ वेळेत न मिळाल्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर पुढील काळात व्याज, दंडात्मक व्याज, विलंब शुल्क व इतर आकार जमा होत गेले. परिणामी, ज्या कर्जावर कर्जमाफीचा लाभ मिळणे अपेक्षित होते, त्याच कर्जाचा बोजा कालांतराने वाढत गेला.

शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीतील विलंबाची किंमत पात्र शेतकऱ्याने मोजणे हा न्यायाचा विषय आहे.

त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना ज्या दिनांकास लागू करण्यात आली, त्या दिनांकास संबंधित पात्र शेतकऱ्याच्या कर्जखात्यावर असलेली मुद्दल व त्या दिनांकापर्यंतचे ग्राह्य व्याज हीच कर्जाची आधारभूत रक्कम ग्राह्य धरण्यात यावी.

त्यानंतर शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत न मिळाल्यामुळे कर्जखात्यावर जमा झालेले दंडात्मक व्याज, विलंब शुल्क व इतर अतिरिक्त आर्थिक बोजा पूर्णपणे माफ करण्यात यावा.

१. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांची विशेष पडताळणी करण्यात यावी.

२. पात्र ठरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ मध्ये विशेष बाब म्हणून समावेश करण्यात यावा.

३. या पात्र शेतकऱ्यांचे रु. २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात यावे.

४. कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ लागू झालेल्या दि. २८ जून २०१७ रोजीच्या कर्जखात्याची स्थिती आधारभूत धरावी.

५. त्यानंतरच्या कालावधीत शासनाच्या योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे वाढलेले दंडात्मक व्याज, विलंब शुल्क व इतर अतिरिक्त आकार पूर्णपणे माफ करण्यात यावेत.

६. तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना विशेष ऑफलाइन पडताळणीची संधी देण्यात यावी.

७. जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मध्यवर्ती बँका व इतर संबंधित बँकांना अशा पात्र वंचित शेतकऱ्यांची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश देण्यात यावेत.



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।। पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

आपल्या नेतृत्वाखाली २०१७ मध्ये ज्या भावनेतून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा देण्यात आला, त्याच शेतकरीहिताच्या भावनेतून आज त्या वेळी पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही न्याय मिळावा, ही अपेक्षा आहे.

२०१७ मध्ये आपल्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या कर्जमाफीच्या निर्णयाला आज २०२६ मध्ये एक न्याय्य पूर्तता देण्याची संधी आपल्या सरकारसमोर आहे. पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू नये आणि शासनाच्या विलंबाचा आर्थिक बोजा शेतकऱ्यावर पडू नये, या भावनेतून तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा.

पात्र वंचित शेतकऱ्याला रु. २ लाखांपर्यंतची कर्जमाफी देऊन, शासनाच्या विलंबामुळे वाढलेले दंडात्मक व्याज व इतर अतिरिक्त आर्थिक बोजा पूर्णपणे माफ करण्यात यावा, ही विनंती.

कार्यवाहीची रुपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

सविनय धन्यवाद...!!

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रतिलिपी

१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
२. श्री. वंडू गौरकार, सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमुल्य आयोग, मुंबई
३. श्री. रवी चहारे, अध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, चंद्रपूर महानगर, चंद्रपूर
४. श्री. हरीश ढवस, तालुका अध्यक्ष, पोंभुर्णा, जि. चंद्रपूर
५. श्री. पिंटू देऊळकर, तालुका अध्यक्ष, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
६. श्री. चंदु मारगोनवार, तालुका आध्यक्ष, मुल, जि. चंद्रपूर
७. श्री. श्रीनिवास जंगमवार, तालुका अध्यक्ष, चंद्रपूर, जि. चंद्रपूर


पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

Scanned with OKEN Scanner